# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट :- ४२३/२०२३ दिनांक - ११/१२/२०२३

## खुनासारख्या गंभीर गुन्हयात गेले ११ महिन्यापासुन पाहिजे असलेल्या आरोपीतास अटक -मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणा-या फिर्यादी नामे श्रीमती रुपादेवी राजेशकुमार राज वय.४० वर्षे रा.रुम नं.१०३/सी विंग, क्विन्स पार्क, शिवारगार्डन, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे यांनी दिनांक ३०/०१/२०२३ रोजी फिर्याद दिली कि, त्यांचा मुलगा अंकुश राज यास अनोळखी आरोपीत इसमांनी गैरकायदयाची मंडळी जमुन मनाई आदेशाचे उल्लंघन करुन त्यास लाथाबुक्यांनी मारहाण करुन धारदार टोकेरी चॉपर व तलवारी या हत्यारांनी त्याचे छाती-पाठीवर भोसकुन गंभीर दुखापत करुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन मिरारोड पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ३७/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३०२,१२०(ब),३२३,१४३,१४५,१४७,१४८,१४९,३४ सह भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४ व २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व (३),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासात एकुण ११ आरोपीतांना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयात एकुण ३ पाहिजे आरोपीत असुन त्यांचा शोध गेले ११ महिन्यापासुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांचेकडुन चालु होता. व त्यांचेबाबत गोपनियबातमीदारांना माहिती देवुन शोध होणेबाबत अवगत करण्यात आले होते.

वर नमुद पाहिजे आरोपीत यांचा शोध घेत असतांना दिनांक ०९/१२/२०२३ रोजी मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, वर नमुद ३ पाहिजे आरोपींपैकी पाहिजे आरोपी रोहितकुमार शंकर पासवान वय.२४ वर्षे ५ महिने रा.रुम नं.५०८, म्हाडा बिल्डींग, दत्त मंदीराजवळ, जनता नगर, माशाचा पाडा, काशिमिरा, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे मुळ रा.रौणा, ता.बेलागंज, जिल्हा गया, राज्य बिहार हा त्याचे नातेवाईकांना भेटणेकरीता काशिमिरा हद्दीतील चैना ब्रिज येथे भेटणेकरीता येणार आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने मा.वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी रवाना होवुन चैना ब्रिजचे आसपास दबाधरुन बसलो असता सदर ठिकाणी पाहिजे आरोपी रोहितकुमार शंकर पासवान वय.२४ वर्षे ५ महिने रा.रुम नं.५०८, म्हाडा बिल्डींग, दत्त मंदीराजवळ, जनता नगर, माशाचा पाडा, काशिमिरा, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे मुळ रा.रौणा, ता.बेलागंज, जिल्हा गया, राज्य बिहार हा मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन गुन्हयाचे कामी गुन्हयाचे तपास अधिकारी यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, मिरारोड, श्री.महेश तरडे सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री.राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/संतोष सांगवीकर, सपोनि/रामकृष्ण बोडके, पोउपनि/किरण वंजारी, स.फौ.प्रशांत महाले, पोहवा/प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, परेश पाटील, तानाजी कौटे, पो.अमं.शंकर शेळके,अथर्व देवरे यांनी केलेली आहे.